MHKO120001372006

## नियमित फौजदारी खटला ४५/२००६
## निशाणी क्र. ६०८ वरील आदेश

**(सरकार वि. आनंदराव व्यंकोजी पाटील)**

प्रस्तुतचा अर्ज अवसायक, भुदरगड नागरी सहकारी पतसंस्था मर्या., गारगोटी यांनी अशोक शांताराम नानोडकर यांचे नावे असलेली मौजे मणेरी, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग येथील गट क्र. ५७/०१ व ५८/०१ मधील राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID) यांनी केलेला हस्तांतरण बंदी आदेश कमी करणेबाबत न्यायालयाने आदेश पारित करावा याकरिता दिला आहे.

२. प्रस्तुत अर्जात अवसायक यांनी असे कथन केले आहे की, भुदरगड नागरी सहकारी पतसंस्था मर्या., गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर ही संस्था मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा. पुणे यांनी दि. १३/०२/२००७ चे आदेशान्वये अवसायनात घेतली असून सध्या संस्थेवर विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर विभाग यांचे अध्यक्षतेखालील ५ सदस्यीय अवसायक समिती कार्यरत आहे.

३. सदर प्रकरणातील आरोपी क्र. ६ अशोक शांताराम नानोडकर, रा. ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग यांना भुदरगड नागरी सह. पतसंस्था, गारगोटी या संस्थेने कर्ज अदा केले आहे. सदरची संस्था आर्थिकदृष्टया अडचणीत आलेनंतर सदर सर्व कर्जदार यांचे खातेची चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID) यांचेकडून करणेत आली आहे. यानुसार अशोक शांताराम नानोडकर यांची त्यांचे कर्ज प्रकरणाची चौकशी होवून नानोडकर यांचेविरुद्ध गु. र. नं. ७३/२००४ दाखल झाला आहे. त्यानुसार आरोपी नानोडकर यांचेविरुद्ध गुन्हा दाखल असून त्याची चौकशी प्रलंबित आहे व नानोडकर यांचे मिळकतीवर राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID) यांनी हस्तांतरण बंदी आदेश

पारित केला आहे व त्यानुसार मिळकत मौजे मणेरी येथील गट क्र. ५७/०१/, ५८/०१, २४४/ड, ७६अ/६क२ व ८८अ मधील मिळकतींबाबत हस्तांतरण बंदी आदेश पारित केला आहे. श्री. नानोडकर यांनी त्यांचे कर्जापैकी संबंधीत मिळकतींची कर्जे पूर्णफेड केली आहेत व त्यानंतर संबंधीत मिळकतींवरील बोजा कमी करणेकामी संबंधीत तलाठी यांना पत्र दिले व त्यानुसार अवसायक समिती यांनी सभेमध्ये दि. ०३/०७/२०२३ ला चर्चा करुन श्री. नानोडकर यांनी ७५,४५,०००/- मुद्दल कर्ज रक्कमेची ५ प्रकरणे आदरणीय उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील एकरकमी परतफेड कर्ज योजनेनुसार निरंक केली आहेत व श्री. नानोडकर यांचे नावे अद्याप ५० लाख व ७५ लाख मुद्दल रक्कमेची कर्ज प्रकरणे शिल्लक आहेत, त्यापैकी, ५० लाख कर्ज फेडीसाठी श्री. नानोडकर यांनी संस्थेकडे अर्ज सादर केला व श्री. नानोडकर यांनी अर्जात नमूद केलेप्रमाणे कर्ज फेडीकरिता मौजे मणेरी, ता. दोडामार्ग येथील गट क्र. ५७/०१ व ५८/०१ या मिळकतींवरील बोजा नोंद कमी केला आहे व त्यानुसार हस्तांतरण बंदी आदेश कमी करावा असे सभेमध्ये ठरले व त्या ठरावाची प्रत न्यायालयात जोडली आहे. अर्जदार संस्थेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालय येथे ठेवीदार यांनी वेळोवेळी याचिका दाखल केल्या आहेत व त्यानुसार जनहित याचिका क्र. १९४/२००४ नियमितपणे सुरु आहेत व त्यानुसार आदरणीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी या न्यायालयापुढे अर्ज करणेचे निर्देश दिले आहेत. तरी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID) शाखा सांगली यांनी मौजे मणेरी, ता. दोडामार्ग येथील गट क्र. ५७/०१ व ५८/०१ यामधील हस्तांतरण बंदी आदेश कमी करावा.

४. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने त्यांचे म्हणणे नि.क्र.६३६ अन्वये सादर केले व योग्य ते आदेश पारित करण्याची विनंती केली. त्यानंतर, आदरणीय उच्च न्यायालय, मुंबई यांची जनहित याचिका १९६/२००४ मधील दि. १८/०१/२०१३ चे आदेशाचे अवलोकन केले. तसेच राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID) यांनी कोणत्या कायदेशीर तरतुदीनुसार संबंधीत हस्तांतरण बंदी आदेश केला होता त्याबाबत त्यांचे म्हणणे सादर केले त्याचेही अवलोकन केले.

५. आरोपी क्र. ६ ने अर्ज मंजूर करणेची विनंती केली व राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID) यांनी म्हणणे असे दिले की, संबंधीत आदेश त्यांनी संबंधीत गुन्हयात

फौ.प्र.सं. कलम १०२ अन्वये आदेश पारित केला व मिळकत जप्त केली. या न्यायालयाने फौ.प्र.सं. कलम १०२ चे तरतुदीचे अवलोकन केले व प्रस्तुतचे प्रकरण हे फौजदारी स्वरुपाचे आहे याबाबत कोणताही वाद नाही व त्याला फौ.प्र.सं. १९७३ च्या तरतुदी लागू होतात, परंतु, असे असले तरी, पोलीसांना एखादी मिळकतीचा गुन्हयात वापर झाला असलेस ती जप्त करणेचा अधिकार असला तरी मिळकत (Property) या शब्दात केवळ जंगम मालमत्ता (Movable Property) चा समावेश होतो व त्यामध्ये स्थावर मिळकतीचा (Immovable Property) समावेश होत नाही. सदरकामी मी पुढील न्यायनिर्णयाचा आधार घेतो.

***Nevada Properties Pvt. Ltd. Through it's Directors vs. State of Maharashtra, 2019, Cri. Appeal No. 1481/2021 along with Cri. Appeal No.1122/2011, 1482-1485/2019, 1487/2019 decided on 24/09/2019*** wherein the Hon'ble Apex Court has taken in to consideration the provisions of section 102 of Cr.P.C. and held that, the Police Officer has no authority to seize, attach and seal the immovable property and the term used 'any property appearing in the section 102 of Cr.P.C. does not include 'immovable property' and therefore, police officer/investigating officer in a criminal case cannot take custody and cannot seized any immovable property.

६. सदर न्यायनिर्णयात आदरणीय सर्वोच्च न्यायालय यांनी असे म्हटले आहे की, पोलीसांना कोणत्याही गुन्हयामध्ये फौ.प्र.सं. कलम १०२ अन्वये स्थावर मिळकत जप्त करणेचा अधिकार नाही. त्यामुळे, जरी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID) यांनी फौ.प्र.सं. कलम १०२ अन्वये मिळकत हस्तांतर जप्त केली असली तरी तसे करण्याचा कायदेशीर अधिकार त्यांना नाही. त्यामुळे, संबंधीत मिळकतीवर ते बोजा चढवू शकत नाहीत. त्यामुळे, फेरफार क्र.१९३३ अन्वये मौजे मणेरी, ता. दोडामार्ग येथील गट क्र. ५७/०१ व ५८/०१ या मिळकतींवर जो हस्तांतरण बंदी आदेश झाला आहे तो रद्द करणेत येतो. कारण, ती प्रक्रिया फौ.प्र.सं. १०२ अन्वये वैध नाही. मी खालील आदेश पारीत करतो.

# <u>आ दे श</u>

१. मौजे मणेरी, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग येथील गट क्र. ५७/०१ व ५८/०१ या मिळकतींवरील हस्तांतरण बंदी आदेशाची नोंद कमी करण्यात यावी व तशी नोंद संबंधित तलाठी व मंडल अधिकारी यांनी करावी.

२. सदर आदेशाची नोंद दोन्ही बाजूंनी घ्यावी.

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2025.12.26 12:01:06 +0530

**(एन. डी. रुद्रभटे)**

**दिनांक :** २४/११/२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
गोरगोटी